# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

जा.क्र. कबचौउमवि/१६/बातमी/२०२४ दि. २५ जुलै, २०२४

जळगाव दि.२५ (प्रतिनिधी) : महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांनी शिक्षण सर्वांसाठी समृध्द महाराष्ट्रासाठी या अंतर्गत गुरूवार दि. २५ जुलै रोजी सकाळी १० वाजता वेबीनारच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांच्याशी शासन निर्णय आणि विविध शिष्यवृत्ती योजना या विषयी संवाद साधला.

यावेळी राज्याचे इतर मागास वर्ग व बहजन कल्याण मंत्री श्री. अतुल सावे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, इतर मागास वर्ग व बहजन कल्याण विभागाचे प्रधान सचिव विनया सिंघल, तंत्र शिक्षण संचालक डॉ.विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर उपस्थित होते.

या वेबीनारकरीता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील अधिसभा सभागृहात कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे तसेच २८२ विद्यार्थीनी, २० शिक्षक व प्रशाळा संचालक उपस्थित होते.

या वेबीनारव्दारे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी ज्या विद्यार्थिनींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थिनींना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्कात १००% सवलत देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या निर्णयाबद्दल तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. योजनांचे पोर्टल सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी लॉगीन करुन तत्काळ अर्ज सादर करावेत. या योजनेचा संबंधित सर्वांनी लाभ घ्यावा व शिवाय विद्यार्थिनींच्या काही सूचना असल्यास त्या कळविण्याचे आवाहन केले. तसेच विद्यार्थिनींनी ऑनलाईन विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. या योजनेतील लाभार्थीच्या रकमेचा परतावा शासनाकडून दोन टप्प्यात करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच इतर मागास वर्ग व बहजन कल्याण मंत्री श्री. अतुल सावे यांनी देखील या वेबीनारव्दारे विविध योजनांची माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांकडून योजनांचा अधिकाधिक लाभ घेतला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली. जवळपास दोन तास हा संवाद कार्यक्रम सुरु होता. या कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव विकासचंद्र रस्तोगी, तंत्रशिक्षण संचालक डॉ.विनोद मोहितकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसचालन उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर यांनी केले.

---

मा. संपादक,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रात प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क □धिकारी करीता